# घाटे यांनी मांडला नदीचा जीवनप्रवास

म. टा. प्रतिनिधी, पुणे



केतकी घाटे

नदी म्हणजे काय, तेथील परिसंस्था, नदीतील आणि काठावर असलेले जैवविविधतेचे महत्त्व उलगडून निसर्गतज्ज्ञ केतकी घाटे यांनी नदीचा जीवनप्रवास उलगडला. गेल्या काही वर्षांत अशास्त्रीय पद्धतीने होणाऱ्या विकासकामांचा जलस्रोतांवरील परिणाम, नदीच्या प्रवाहातील अडथळे आणि जलप्रदूषण या समस्यांचे वास्तवही त्यांनी उलगडले.

ग्रीन बर्ड्स इनिशिएटिव्हतर्फे निसर्गप्रेमी कै. माधव कृष्णराव उर्फ राजाभाऊ फुलंब्रीकर यांच्या स्मरणार्थ व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. या व्याख्यानमालेचे तिसरे वर्ष होते. या व्याख्यानमालेत घाटे यांनी नद्यांची परिसंस्था आणि जैवविविधता यांची विस्तृत माहिती देणारे 'नदी : जीवनाचा संतत प्रवाह' या विषयावर व्याख्यान दिले. महापालिकेच्या इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्रात झालेल्या या व्याख्यानमालेत दुसऱ्या दिवशी निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. अशोक झंवर यांच्या 'आपले आरोग्य आपल्या हाती' हे व्याख्यान झाले. डॉ. झंवर यांनी निसर्गाशी मैत्री करून आपले स्वास्थ्य कसे राखावे, या संदर्भात खुमासदार आणि खरमरीत शैलीत माहिती दिली. रोहिणी फडके यांनी कागदापासून केलेली कृत्रिम फुले वापरून विविध पुष्परचना सादर केल्या.

## फुलंब्रीकर यांच्या स्मरणार्थ व्याख्यानमाला

सजग मनाने निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन करावे, निसर्गातील जैवविविधतेचा सार्थ अभिमान वाटून त्याची जपणूक करावी, अशी भावना दृढ व्हावी आणि कृती घडावी, या उद्देशाने ही व्याख्यानमाला घेण्यात आली, असे ग्रीन बर्ड्स इनिशिएटिव्हच्या संस्थापिका प्रिया फुलंब्रीकर यांनी सांगितले.